



॥श्री॥

## साधक सोपान

प. पू. मंदाताई गंधे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेमधील काही भाग -

आनंद हा असा शब्द आहे की, त्याचा विरुद्धार्थी शब्द नाही. आनंदरूप परब्रह्माच्या ठिकाणी 'एकमेकाद्वितीयम्' या वास्तवतेमुळे दुसरे नाहीच, म्हणून विरोधीही काही नाही, मग विरोधवाचक विरुद्धार्थी शब्द कोठून असणार? विषयरहित सुखदशा म्हणजे आनंद. आनंद लाभलेल्याच्या चित्तावर त्याचे तरंग उठणेही शक्य आहे. त्या तरंगाचे मधु गुंजन म्हणजे आनंदाची गाणी. प्रत्येकाने स्वतःच्या जीवनातील रडगाण्यातून बाहेर पडावे आणि आनंदाची गाणी गावीत, असा हितबोध 'साधक-सोपान' या ग्रंथाचे लेखक प. पू. डॉ. श्रीकृष्ण देशमुख - जे प. पू. डॉ. काका या नावाने परिचित आहेत - साधकांना करीत आहेत.

----- प. पू. डॉ. काकांनी विहंगगती नसणाऱ्यांसाठी साधक-सोपान बांधून दिला आहे. साधकाने स्वजीवनाची उंची या सोपानाची एक एक पायरी चढून सुखेनैव गाठायची आहे. या सोपानाच्या अकरा पायऱ्या आहेत. चढणाऱ्याने प्रत्येक पायरीवर स्वतःच्या पावलांची पकड घट्ट जमवायची, दृढ करायची आणि नंतर सावधपणे तोल सांभाळीत वरच्या पायरीवर आरूढ व्हायचे. ह्या पायऱ्या अर्थातच परमार्थाच्या वाटेवरील प्रगतीचे टप्पे आहेत. मागचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण करून पुढचा गाठायचा आहे.
शास्त्रशुद्ध, तर्काधिष्ठीत व सश्रद्ध विवेचन करून प्रत्येक टप्प्याचे स्वरूप लेखकाने वाचकापुढे पिंजून पिंजून पारदर्शी करून मांडले आहेत. आता साधकाने डाव्या हातात हे पुस्तक घ्यायचे, एक एक ओळ वाचायची, उजव्या हाताने तदनुसार कृती करायची आणि पावले उचलून पुढे जायचे बस. इतके नेमके, नेटके, सुलभ व स्पष्ट मार्गदर्शन साधक-सोपानात मिळते. परमार्थपथाचा पथिक नसणाऱ्या नास्तिकालाही या मार्गात आणून सोडण्याची कमाल किमया लेखकाने साधक-सोपानात केल्याचे प्रत्ययास येते.

विषयानुक्रमणिका -

(१) आस्तिक-नास्तिक (२) मायातत्त्व (३) प्रवृत्ती-निवृत्ती (४) विवेक (५) वैराग्य (६) शमादिषटक् (७) मोक्षेच्छा (८) तनुचतुष्टयनिरसन (९) निष्काम कर्मोपासना (१०) श्रीगुरूनिष्ठा (११) गावी आनंदाची गाणी.

(यातील 'आस्तिक-नास्तिक' व 'गावी आनंदाची गाणी' हे लेखकाने स्वतः लिहिलेले आहेत बाकीचे सर्व लेख त्यांच्या विविध प्रवचनांच्या ध्वनिफितीवरून साधकांनी लिहिलेले आहेत. प्रथमावृत्तीतील लेखन ध्वनिफितीवरून जसेच्या तसे - प्रवचनाच्या शैलीतच - होते. तथापि द्वितीय आवृत्तीत डॉक्टरकाकांच्या अनुमतीने व मार्गदर्शनाखाली लेखातील विचारधनाला धक्का लागू न देता लेखातील विषयांची पुनरावृत्ती कमी करून पुनर्लेखन केलेले आहे. येथे प्रवचनाची शैली व लेखाची शैली यांचा सुयोग्य मिलाफ आढळेल.)

'आस्तिक-नास्तिक' हा दीर्घ लेख, मुख्यतः लेखक व त्यांचा मित्र यांच्यातील संवादरूपाने लिहिलेला आहे. त्यातील काही भाग -

मी - ------वैदिक धर्म पुन्हा सावरला, यज्ञसंस्थेचा ऱ्हास होत गेला व गीताधर्माचा उदय झाला. गेल्या सुमारे हजार वर्षात वेद व यज्ञ यांचा नाजूक हातांनी फेरविचार केला गेला.
तो - असे केल्याने वेदप्रामाण्य नाकारले जात नाही का ?
मी - अशी ही प्रक्रिया घडत जाणे हे वेदांनाच अपेक्षीत आहे. कृत, त्रेता, द्वापार व कली अशा चार युगांचे युगधर्मच वेगळे आहे हे आमचे म्हणणे आहे. कलीमध्ये वेदांचे महत्त्व व प्रामाण्य नाकारले जाईल हे अपेक्षीत आहे. संतांनी ही प्रक्रिया संघर्षरहित रितीने पूर्णत्वास नेली होती. संतांनी ज्या भागवत महापुराणाचा फार मोठ्या प्रमाणात आश्रय घेतला त्या भागवताच्या महात्म्याच्या पहिल्या अध्यायात जणू वेदप्रामाण्याची अखेर झाली, व वेदातील ज्ञानकांड म्हणजे उपनिषदे किंवा वेदांत यांचे प्रामाण्य अबाधित राहिले. याचे कारण सांगतांना भागवत सांगते - 'इह घोरे कलौ प्रयः जीवश्चासुरां गतः।' या भयंकर कलियुगात बहुतेक माणसे असुर वृत्तीची झाली आहेत. असुर म्हणजे देवांचे वैरी ही व्याख्या येथे पुर्णपणे गैरलागू आहे. ही पौराणिक व्याख्या आहे. ईशावास्य उपनिषदाने 'असुर' या संकल्पनेची दिशा दाखविली आहे. ------ शरीरामध्ये 'मीच शरीर आहे' अशा निश्चयाने जो रमतो तो असुर. अशी व्यक्ती सभ्य, सुशिक्षित, निर्व्यसनी व सदाचारी असू शकते.

------ हे पुराणिक, कथाकार, कीर्तनकार (श्रीसंत एकनाथांसारखे प्रगल्भ, अनुभवसंपन्न नसलेले) श्रोत्याची सामान्य बुद्धी, भावना, परंपराप्रियता, नाट्य, संगीत इत्यादींच्या आधाराने आपले काम करीत असतात. या सर्व प्रकारात सांगण्या ऐकण्यापलीकडे कोणीच काही करावयाचे नसते! मग प्रसंगानुसार प्रवृत्ती, निवृत्ती, प्रयत्न, प्रारब्ध, सगुण, निर्गुण, धर्म, अधर्म, परंपरा, पुरोगामित्व, असे हेलखावे खात जीवन निघून जाते. पुढे विचित्र समीकरणे तयार होतात ती अशी -

प्रवृत्ती = नित्याचे सामान्य जीवन जगत राहणे. निवृत्ती = नित्याचे सामान्य जीवन रडत जगणे.
प्रयत्न = विशेष काही न करता होतो तो. प्रारब्ध = विशेष काही न करता घडत जाते ते.
सगुण = हजारो मूर्तीत वेगळ्या नावाने राहणारा देव. निर्गुण = जे फक्त ग्रंथात व संतांच्या अनुभवात असते ते.
धर्म = दसरा, दिवाळी, लग्न, बारसे, श्राद्ध या दिवशी प्रगट होणारा. अधर्म = परंपरांना सोडून केलेले कृत्य
परंपरा = विनाचौकशी डांबून ठेवलेल्या समजुती. पुरोगामित्व = पुढे म्हणजे कुठे हे माहीत नसतांना पुढे जाणे.
माया = ज्या वेळी जी गैरसोयीची असते ती. प्रवृत्ती = टाकता येत नाही म्हणून टाकू नयेत त्या सहज मानवी प्रवृत्ती.
अनित्य = मूर्खपणाने हातातून निसटणारी वस्तू. नित्य = जवळ आहे तोपर्यंत असणारे.
संत = काही न शिकता फक्त पूजा करण्याची व्यक्ती. श्रीगुरू - संकटात अटकपूर्व जमीन देणारे.
शिष्य = आपले गुरू फार फार मोठे आहेत असे सांगणारा.

तो - अरे थांब! थांब! माझा पुढावा (Initiative) तू हिरावून घेत आहेस. तू सुद्धा अशी टिंगल करशील असे वाटले नव्हते.
मी - अरे, आमच्या संतांनी परमार्थातील अज्ञान, उथळपणा, ढोंगावर अत्यंत धारधार हल्ले चढविले आहेत. तुला पाहावयाचे असेल तर तुकोबारायांची गाथा व समर्थांचा दासबोध पाहा. समाजाच्या सोशिकपणावर माजून भलते वाद घालणाऱ्यांना सुद्धा तशी टिका करता येणार नाही. ------

मी - ------ माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर जी सर्वात मोठी कमाई करण्यासारखी असते त्या कमाईला 'परमार्थ' असे म्हणतात. अर्थ म्हणजे प्राप्तव्य. जे मिळवावयाचे असते ते. परम प्राप्तव्य म्हणजे सत्य. माणूस जन्माला आल्यानंतर काय करावे त्यासंबंधी सर्वसाधारणपणे विचार काय असतो ते पाहू.

१) मी माणूस म्हणून जन्माला आलो अहे व मला वेगळे काही केले पाहिजे अशी मुळीच जाणिव नसते.
२) माणूस म्हणून जन्माला आल्यावर वेगळे काही करावयाची आवश्यकता वाटत नाही.
३) कला, क्रिडा, वाङ्.मय, वाणिचे वैभव, सौंदर्याचा अस्वाद, प्रापंचिक वैभव इत्यादीसाठी मानवी जन्माचा उपयोग केला पहिजे.
४) ज्या समाजात मी माणूस म्हणून जन्माला आलो त्या समाजासाठी काहीतरी केले पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, इत्यादी संबंधी माझी सामाजिक जबाबदारी मी उचलली पाहिजे.
५) ज्याने हे जग निर्माण केले, अनंत अतर्क्य सृष्टी निर्माण केली त्या ईश्वराच्या उपासनेत सेवेत व चिंतनात निमग्न राहून त्याचे दर्शन घेतले पाहिजे.
६) या अनंत कोटी ब्रह्मांडांना व्यापून राहणारे 'सत्य' शोधून काढून सत्याचा व माझा काय संबंध आहे त्याचा शोध घेतला पाहिजे.
मी जे आता तुझ्याशी बोलणार आहे ते सहाव्या प्रकाराविषयी असेल. हे सर्व प्रकार सृष्टीच्या निर्मितीपासून आजपर्यंत आहेत व राहतील, त्यामुळे त्यातील चूक कोणता व बरोबर कोणता, काय असावे, काय नसावे, इत्यादी विचार निरर्थक आहेत. या सहाव्या प्रकाराला परमार्थ असे म्हणतात......

"वैराग्य" या लेखातील काही भाग -

भर्तृहरीलिखित काव्यरचनांच्या तीन शतकात 'वैराग्य शतक' नावाचा एक फार सुंदर ग्रंथ आहे. त्यामध्ये त्यांनी स्पष्ट शब्दात लिहिले आहे 'जे वैराग्य अभयरूप आहे, त्याचीच माणसांना भीती वाटते. ज्याने निर्भयता प्राप्त होते, त्याचीच भीती वाटावी हे एक मोठे आश्चर्य आहे'.

----- वैराग्य कोणाला? कशाचे? आणि कशासाठी? अशा तीन प्रश्नांचा उलगडा करताना एका विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला तर विचारांच्या स्पष्टतेच्या दृष्टीने, नेमकेपणाने, तो विषय समजावून घेता येतो. वैराग्याची संकल्पना ही उत्तरे आपल्यासमोर स्पष्ट करते आणि मग वैराग्यात भिण्यासारखे काही नाही हे आपल्याला पटते.
------मग वैराग्य कोणाला असते? याचे उत्तर ते अंतःकरणाला (जीवाला) असते. त्याचा अंतःकरण नावाचा जो घटक आहे, ज्याच्यामुळे जीवभाव येतो, त्या अंतःकरणाने विरक्त व्हावयाचे आहे. पण हे जरी खरे असले तरी हे अंतःकरण वासनेनुसार कार्य करीत असते. म्हणून विरक्त होण्यामध्ये अडचण अनेक जन्मातील संस्कारांची किंवा वासनांची आहे. या विषयाशी सुसंगत असा श्रीतुकाराम महाराजांचा हा अभंग आहे -
इंद्रियांचा जय वासनांचा क्षय। संकल्पाहिवरी न ये मन। तुका म्हणे न ये जाणिव अंतरा। अंतरी या थारा आनंदाचा॥

वैराग्यासंबंधी स्पष्ट आकलन या अभंगातून होते. ----तुकाराम महाराजांच्या अभंगावरून लक्षात येते की वैराग्य आनंदासाठीच असते. हा आनंद अंतःकरणात प्रगट होतो. म्हणून वैराग्य हे अंतःकरणालाच येते. अंतःकरणाला येणारे वैराग्य हे जगाविषयी, स्वतःच्या वस्तूसंबंधी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या देहाविषयी यावे लागते.
वैराग्यात कर्माचा त्याग करावयाचा नसतो तर कर्म फलाचा त्याग करावयाचा असतो. स्वामित्वाच त्याग करावयाचा नसतो तर ममत्वाचा करावयाचा असतो आणि देहाचा त्याग करावयाचा नसतो तर देहतादात्म्याचा त्याग करावयाचा असतो. दैनंदिन जीवनात वैराग्याचा नुसता शाब्दिक विचार केला तर तो हस्तिदंती मनोऱ्यावर बसून केलेला विचार ठरतो. तो व्यवहारात आणणे शक्य नाही. तो फक्त ऐकण्यासाठी छान, रंजक असतो. येथे तसे अपेक्षीत नाही. तो जीवनात उतरणे अपेक्षित आहे. नेमके वैराग्य ते असे आहे.

'निष्काम कर्मोपासना' मधील काही भाग -

----- मोक्षेच्छा तीव्र होण्यासाठी त्या अंतःकरणाची स्थिरता अभिप्रेतच आहे. एकदा शुद्ध चित्ताने मोक्षेच्छेची पकड घेतली की त्यात अस्थिरता संभवत नाही. अस्थिरता असेल तर ते चित्त शुद्ध नाही असा अर्थ होतो. शुद्ध चित्तात आत्माच्या अंतिम शुद्धतेची ओढ लागते. हा ईश्वरी नियोजनाच भाग आहे. हा अधिकार प्राप्त होण्याच्य दृष्टीने निष्काम कर्मोपासनांचा विचार करणे आवश्यक आहे. शुद्ध चित्त म्हणजे काय याचा विचार आवश्यक आहे. चित्तशुद्धीसाठी काही निकष लावून पाहता येतात. सर्वसाधारणपणे पश्चातबुद्धी नसावी असे त्याचे लक्षण सांगता येते. आपण प्रत्येक गोष्ट होऊन गेल्यावर तिचा तीन प्रकारे विचार करतो. १) हे मी केले नसते तर बरे झाले असते. २) हे मी केले असते तर बरे झाले असते. ३) कुठून मला बुद्धी झाली आणि मी हे केले! या तीनही प्रकारे जेव्हा मनात विचार येतो तेव्हा चित्त नक्की शुद्ध नसते. मुळात 'केले नसते तर बरे झाले असते', या विचारातच 'करू नये ते केले' असा निष्कर्ष निघतो. 'बरे झाले असते किंवा नसते' या विचारात अनुकूल किंवा प्रतिकूल क्रियांच्या संदर्भात स्वतःची चूक स्वतःच मान्य केलेली असते व सावधपणा नव्हता हे ही स्वतःशीच कबूल केलेले असते. ------

शास्त्र संगते की वेदविहित निष्काम कर्म केल्याने चित्त शुद्ध होते. निष्काम कर्म-उपासना हे चित्त शुद्ध व शांत करणारे साधन आहे. वेदांच्या आज्ञा आपल्याला स्पष्टपणे समजावून सांगण्यासाठी संत अवतार घेतात. ------ प्रत्येक अडचणीच्या वळणावर वर्माच्या सूचना देत, अखंड मार्गदर्शनाचे व्रत चालवणारे संत 'भूदेव' या नावाने ओळखिले जातात. तुकाराम महाराजांचे अभंग, समर्थांचा दासबोध हे सामान्य माणसाला फार मोठे मार्गदर्शन करणारे ग्रंथ आहेत. पण हे मार्गदर्शक होतात की नाही हे ठरण्याचे रहस्य समजावून घेत वाचण्यात आहे. ग्रंथ वाचताना 'संतांनी ते माझ्यासाठी सांगितले आहे' हा विचार ठेवावा आणि ते आचरणात आणावे तरच त्यांचा उपयोग होतो. उदा. - 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचार वेच करी।' या अभंगात कोणालाही न फसविता, आपले काम उत्तम करून अर्थार्जन करणे व केवळ स्वतःच्याच इच्छांच्या पूर्तीसाठी व्यय न करता 'उद् आस' (आशा झुगारून दिलेला) अशा विचाराने ते वेचणे यात आजच्या काळासाठी फार सुंदर आदर्श दिला आहे. तो सांभाळला जावा. पूर्ण शांती, स्थिरता शुद्धी, समाधान ही समचिताची लक्षणे आहेत. त्यासाठीच निष्काम कर्म आणि निष्काम उपासना हे दोन उपाय आहेत. हे उपाय संतांनी सांगितले तसे व शास्त्राने सांगितले तसे केले तर त्याचे फळ म्हणून मोक्षाची इच्छा होते. कारण तसे ईश्वराचे नियोजन आहे. त्यात तसूभर देखील चूक संभवत नाही.

'श्रीगुरुनिष्ठा' मधील काही भाग -

श्रीगुरुनिष्ठा ही साधकासाठी एक सावली असते. श्रांत पांथस्थ जसा एखाद्या विशाल वृक्षाच्या दाट शीतल छायेत बसतो, आणि आपला सारा शीण घालवतो तसा, जन्म-मृत्यूच्या येरझारांनी त्रस्त झालेला थकला भागला जीव श्रीगुरुंच्या कृपाछायेत विसावा घेतो. श्रीगुरुरूप महापुरुषाच्या कृपेला श्रीज्ञानदेव म्हणतात -
म्हणोनी साधका तू माऊली। पिके सारस्वत तुझिये पाऊली। या कारणे मी साउली। न संडी तुझी॥

श्रीगुरुकृपेच्या सावलीला संत 'संसारश्रांताची सावली' म्हणतात. प्राप्त झालेले दुर्लभ मनुष्यत्व सांभाळणे, मुमुक्षुत्व कमावणे आणि महत् भाग्याने मिळालेल्या महापुरुषाच्या आश्रयाखाली जीवनाचे सार्थक करणे, आत्मरूप होणे, हीच साधकांची खरी साधना असते.

(पुढे सहा प्रकारच्या 'गुरुनिष्ठा' वर्णिल्या आहेत. ) १) प्रणिपातनिष्ठा, २) सेवानिष्ठा, ३) प्रश्ननिष्ठा, ४) ज्ञाननिष्ठा, ५) नामनिष्ठा, ६) ध्याननिष्ठा.

श्रीगुरू या व्यक्तीशी निष्ठा ठेवणे म्हणजे निर्गुण निराकार तत्त्वाच्या सगुण साकार तत्त्वावर निष्ठा ठेवणे होय. या सगुणाच्या आधाराने निर्गुण निराकार आत्मतत्त्वावर, ब्रह्मतत्वावर निष्ठा ठेवण्यास साधकाने शिकायचे असते. श्रीगुरुरुपातील निर्गुण निराकार तत्त्वावरची निष्ठा हीच अंतिम निष्ठा आहे. ----------

श्रीगुरुंच्या देहाशी ठेवण्याच्या निष्ठेचा, म्हणजे देह निष्ठेचा दुसरा घटक म्हणजे त्यांची सेवा. सेवा त्यांच्या देहाची आणि त्यांच्या संबंधितांची करावयाची असते. श्रीगुरुंची काया ब्रह्मरूप आहे या श्रद्धेने त्यांची सेवा केली पाहिजे, कारण तसे शास्त्रवचन आहे. एखादा जन्मसिद्ध हक्क असावा तसा सेवा घेणे हा श्रीगुरुंचा हक्क नाही, पण त्यांची सेवा करणे हा शिष्याचा मात्र अनुग्रहसिद्ध हक्क आहे. श्रीगुरुंना स्वतःला सेवा घेण्याची गरजच नसते. खरे श्रीगुरू शिष्यांकडून सेवेची अपेक्षा ठेवीत नाही. गुरुसेवा हा शिष्याचा हक्क आहे कारण परमार्थाच्या दालनात प्रवेश करण्याचे ते द्वार आहे.

प्रणिपातनिष्ठा, सेवानिष्ठा आणि प्रश्ननिष्ठा या बहिरंग साधनातून गुरुनिष्ठा साकारत असता त्यातून गुरुनिष्ठेचा आणखी एक पैलू उदयाला येतो. श्रीगुरुंनी दिलेल्या परोक्ष ज्ञानावरची ती निष्ठा असते.

साधकांच्या प्रश्नांना उत्तरे देता देता तत्त्वज्ञानाचे, ब्रह्मविद्येचे, एक प्रशस्त दालन श्रीगुरू त्याच्यासाठी खुले करतात. --------

स्वरूपाचा अंदाज आल्याने व साधकाची बुद्धी निःसंदेह झाल्याने त्याची स्वरूपसाक्षात्काराविषयीची ओढ पूर्ण उंची गाठते. मग ती पुन्हा प्रश्ननिष्ठेकडे वळते. आत्मसाक्षात्कारासाठी काय साधन करावे, ते कसे करावे यासंबंधी तो श्रीगुरुंना प्रश्न विचारतो. त्याच्या प्रश्नांनी प्रसन्न झालेले श्रीगुरू त्याला त्रिस्तरीय साधन सांगतात. ते साधन असे -

१) विचार तथा तत्वचिंतन २) नाम तथा भगवत् चिंतन ३) ध्यान तथा भगवत् अनुसंधान, म्हणजेच ज्ञान, भक्ती आणि ध्यान.

ध्यान हे अतिसूक्ष्म असे अंतरंग साधन आहे. ध्याननिष्ठा ही सूक्ष्म अंतरंगनिष्ठा आहे. ध्याननिष्ठा साधली तर समाधीकाळात जीव ब्रह्मरूप होतो.

***